# महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

(संलग्न-अखिल भारतीय कबड्डी फेडरेशन - महाराष्ट्र ऑलिम्पीक असोसिएशन)

नोंदणी क्र.: एफ् ६२६ (मुंबई) व मुंबई २१/१९५६ जी. बी. बी. एस. डी.

कार्यालय : शिवाजी पार्क मैदान, वीर सावरकर मार्ग, दादर (प), मुंबई-४०००२८. संपर्क : २४४४८४१४

E-mail - maharashtra.kabaddi@gmail.com Web - www.maharashtrakabaddi.com



* आजीव अध्यक्ष *
श्री. शरद पवार

* अध्यक्ष *
श्री.अजित पवार

* कार्याध्यक्ष *
श्री. गजानन किर्तिकर

* उपाध्यक्ष *
श्री. सुनिल तटकरे
श्री. अशोक (भाई) जगताप
श्री. अमरसिंह पंडीत
श्री. दिनकर पाटील
श्री. शशिकांत गाडे
श्रीमती शंकुतला खटावकर
श्रीमती नेत्रा राजेशिर्के

* सरकार्यवाह *
अँड. श्री. आस्वाद पाटील

* खजिनदार *
श्री. मंगल पांडे

* सहकार्यवाह *
श्री. रविंद्र देसाई
श्री. मोहन गायकवाड
श्री. मदन गायकवाड
श्री. महादेव साठे
श्री. मनोज पाटील
श्रीमती सय्यदा पटेल
श्रीमती स्मिता जाधव

* समिती सदस्य *
श्री. देवराम भोईर
श्री. बाबुराव चांदेरे
श्री. नितीन बरडे
श्री. मुज्जफर अलि सय्यद
श्रीमती लीना कांबळे


जावक क्रमांक : मराकअ

दिनांक : ०१/०६/२०२२

## राज्यस्तरीय स्थानिक व व्यवसायिक कबड्डी स्पर्धा आयोजन मान्यता.अटी व नियम

१. राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेची मान्यता घेताना राज्य संघटनेची स्पर्धा मान्यता शुल्क राज्य संघटनेकडे नियमानुसार जमा करणे अनिवार्य आहे. मान्यता अर्जावर जिल्हा कार्यवाहची सही व जिल्हा संघटनेचा शिक्का असणे जरूरीचे आहे.

२. स्पर्धा कालावधी कमीत कमी तीन दिवस असावा. त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी स्पर्धेत भाग घेणारे संघ व क्रीडांगण संख्या यांची योग्य जुळवणी करून स्पर्धा कालावधी ठरवावा. सामने शक्यतो रात्रौ ११.०० वाजेपर्यंत संपविण्यात यावेत.

३. स्पर्धेतील सामने भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या नियमानुसार साखळी व बाद पध्दतीने खेळविण्यात येतील.

४. व्यासपीठावरील बॅनर व प्रवेश अर्जावर राज्य व जिल्हा संघटनेच्या मान्यतेचा स्पष्ट उल्लेख असावा.

५. **स्पर्धेतील सहभागी होणारे संघ व संघातील खेळाडूंची राज्य संघटनेच्या नियमानुसार ऑनलाईन नोंदणी होणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीकृत संघच स्पर्धेत सहभागी होतील. प्रवेश अर्ज ऑनलाईनच उपलब्ध असल्यामुळे ऑनलाईन भरलेलाच प्रवेश अर्ज स्विकारण्यात येईल.**

६. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक संघातील १२ खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक अशा १४ जणांना रेल्वे सवलतीप्रमाणे दुसऱ्या वर्गाचे प्रवासभाडे आरक्षण खर्चासहीत संयोजकांना द्यावे लागेल. जेथे रेल्वे प्रवास उपलब्ध नसेल अशा प्रसंगी संबंधीत संघातील १४ जणांना जाण्या येण्याचे एस.टी. भाडे द्यावे लागेल.

७. स्पर्धेत सहभागी होणारे खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापक, निरीक्षक, पंचप्रमुख, सहाय्यक पंच व पंच यांची निवास व भोजन व्यवस्था विनामूल्य आयोजकांना करावी लागेल. शक्यतो खेळाडू, सामनाधिकारी व अधिकारी यांची भोजन व्यवस्था वेगवेगळी असावी.

८. आयोजकांनी स्पर्धेच्या परिपत्रकावर स्पर्धेत देण्यात येणारी रोख पारितोषिके व चषक यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. पारितोषिकांची रक्कम रोख रकमेच्या स्वरूपातच देण्यात यावी. तृतिय क्रमांकाचा सामना न खेळविता उपांत्य फेरीतील दोन्ही उपविजेत्या संघांना समान पारितोषिके रोख रकमेच्या स्वरूपात द्यावीत. दैनंदिन व इतर पारितोषिक देखील रोख अथवा भेटवस्तू स्वरूपात देण्यात यावीत.

९. स्पर्धेसाठी नियुक्त केलेले निरीक्षक, पंचप्रमुख यांना येण्या जाण्याचे प्रथम वर्गाचे रेल्वे किंवा लक्झरी बस भाडे आरक्षण खर्चासह द्यावे लागेल. तसेच दैनंदिन भत्ता रू. ८००/– व नैमित्तिक भत्ता रू. ८००/– (संपूर्ण स्पर्धेकरीता) प्रमाणे द्यावा लागेल. तसेच नियुक्त केलेल्या सहाय्यक पंच प्रमुख व पंच यांना रेल्वे किंवा एशियाड बसचे येण्या जाण्याचे प्रवास भाडे आरक्षण खर्चासह द्यावे लागेल (आवश्यक वाटल्यास आयोजक प्रवास तिकीटाची मागणी करू शकतात). त्याचप्रमाणे दैनंदिन भत्ता रू. ६००/– व नैमित्तिक भत्ता रू.६००/– (संपूर्ण स्पर्धेकरीता) याशिवाय निरीक्षक, पंचप्रमुख, सहाय्यक पंचप्रमुख व पंच यांचा प्रवास २०० किलोमीटरपेक्षा जास्त असेल तर अधिक एक दिवसाचा दैनंदिन भत्ता द्यावा लागेल. स्पर्धा एका दिवसात दोन सत्रात झाल्यास निरीक्षक व पंचप्रमुख यांस त्या सत्राचे रू.४००/– प्रमाणे आणि सहाय्यक पंचप्रमुख व पंचाना रू.३००/– प्रमाणे अधिक भत्ता द्यावा लागेल. निवास व भोजन व्यवस्था संयोजकांतर्फे विनामुल्य करावी लागेल. जर भोजन व्यवस्था नसल्यास प्रतिदिन प्रत्येकी रू.३००/– प्रमाणे भोजन भत्ता द्यावा लागेल.

१०. साखळी सामने ज्या दिवशी संपतील त्याच दिवशी खेळाडूंचे प्रवास भाडे द्यावे लागेल. निरीक्षक, पंचप्रमुख, सहाय्यक पंचप्रमुख व पंच यांचे प्रवास भाडे व मानधन पारितोषिक वितरण समारंभाच्या आदल्या दिवशी द्यावे लागेल.

११. क्रीडांगणावर प्रथमोपचाराची व्यवस्था रूग्णवाहिकेसहित असणे आवश्यक आहे.

१२. पुरूष व महिला खेळाडूंना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी. तसेच गणवेश बदलण्यासाठी स्वतंत्र सोय असावी. पुरूष व महिला खेळाडू तसेच प्रेक्षक यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची व्यवस्था असावी.

१३. निवास व्यवस्थेच्या ठिकाणी विद्युत पुरवठा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी. त्या ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्यात यावी.

* आजीव अध्यक्ष *
श्री. शरद पवार

* अध्यक्ष *
श्री.अजित पवार

* कार्याध्यक्ष *
श्री. गजानन किर्तिकर

* उपाध्यक्ष *
श्री. सुनिल तटकरे
श्री. अशोक (भाई) जगताप
श्री. अमरसिंह पंडीत
श्री. दिनकर पाटील
श्री. शशिकांत गाडे
श्रीमती शंकुतला खटावकर
श्रीमती नेत्रा राजेशिर्के

* सरकार्यवाह *
अॅड. श्री. आस्वाद पाटील

* खजिनदार *
श्री. मंगल पांडे

* सहकार्यवाह *
श्री. रविंद्र देसाई
श्री. मोहन गायकवाड
श्री. मदन गायकवाड
श्री. महादेव साठे
श्री. मनोज पाटील
श्रीमती सय्यदा पटेल
श्रीमती स्मिता जाधव

* समिती सदस्य *
श्री. देवराम भोईर
श्री. बाबुराव चांदेरे
श्री. नितीन बरडे
श्री. मुज्जफर अलि सय्यद
श्रीमती लीना कांबळे


जावक क्रमांक : मराकअ  दिनांक : ०९/०६/२०२२

१४. निरीक्षक,पंचप्रमुख,सहाय्यक. पंचप्रमुख व पंच यांच्यासाठी व्यासपिठावर बसण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

१५. स्पर्धा कालावधीत राज्य संघटनेचे पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य यांना व्यासपीठावर सन्मानपूर्वक आसन व्यवस्था उपलब्ध करून त्यांचा योग्य तो मानसन्मान करावा.

१६. स्पर्धा प्रवेश वर्गणी प्रति स्थानिक संघास रू. ५००/– व व्यावसायिक संघास रू. १०००/– पेक्षा जास्त घेता येणार नाही.

१७. स्पर्धेत सहभागी झालेल्या संघांच्या प्रवेश अर्जावर जिल्हा कार्यवाहची सही व जिल्हा संघटनेचा शिक्का असणे अनिवार्य राहील.

१८. संपूर्ण स्पर्धेवर निरीक्षकाचे मार्गदर्शन बंधनकारक राहील. स्पर्धेसाठी तक्रार निवारण समिती स्पर्धा सुरू होण्यापूर्वी जाहिर करावी. तक्रार निवारण समितीमध्ये निरीक्षक, पंचप्रमुख यांचा समावेश असणे आवश्यक आहे.

१९. सामने कार्यक्रम पत्रिका (ड्रॉ) (गट विभागणी व बाद पध्दतीचे सामने ) स्पर्धा सुरू होण्यापूर्वी संघांना देण्यात यावी. त्यावर स्पर्धा निरीक्षक, पंचप्रमुख व संघटन सचिव यांची नांवे आणि सही असणे आवश्यक आहे.

२०. दोन किंवा त्यापेक्षा अधिक क्रीडांगणे असल्यास पंचप्रमुखा सोबत एका सहाय्यक पंचप्रमुखाची नियुक्ती केली जाईल. प्रत्येक क्रीडांगणावर आठ प्रमाणे राज्य संघटनेतर्फे पंचांची नियुक्ती केली जाईल. तसेच राज्यस्तरीय परीक्षा पास झालेल्या अधीक तीन पंचांची नियुक्ती जिल्हा संघटना करेल

२१. स्पर्धेकरीता राज्य संघटनेने नियुक्त केलेल्या पंचांपेक्षा कमी पंच उपस्थित राहील्यास स्पर्धा निरीक्षक, पंचप्रमुख व जिल्हा सचिव हे अधिक पंच नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घेतील.

२२. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येणारे खेळाडू, पंच व अधिकारी यांच्यासाठी स्पर्धा संपल्यावर परतीच्या प्रवासाच्यावेळी स्टेशन व एस.टी.स्टॅंड येथून त्यांना आणण्यासाठी व परत पोहोचविण्यासाठी बस अथवा अन्य वाहनांची सोय असावी.

२३. स्पर्धेत सहभाग घेतलेल्या संघाच्या प्रवेश अर्जावर निरीक्षकाची स्वाक्षरी असावी.

२४. निरीक्षक व पंचप्रमुख यांना संपूर्ण स्पर्धा कार्यक्रम व परिपत्रकेसह स्वतंत्र फाईल देण्यात याव्यात.

२५. स्थानिक संघांच्या स्पर्धेची मान्यता घेतल्यास व्यावसायिक संघांना सहभागी होता येणार नाही. तसेच व्यावसायिक संघांच्या स्पर्धेची मान्यता घेतल्यास स्थानिक संघांना सहभागी होता येणार नाही.

२६. क्रीडांगणावर खेळाडू व पंच यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी.

२७. क्रीडांगणावर प्रवेश अर्जात नोंद असलेले अधिकृत प्रशिक्षक व व्यवस्थापक यांनाच बसण्याची व्यवस्था असावी.

२८. सामने सुरू असताना शक्यतो निवेदकाने मोजक्या शब्दातच निवेदन करावे. जेणेकरून खेळाडू व पंच यांचे सामन्यावरील लक्ष विचलीत होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२९. स्पर्धेचे उद्घाटन व समारोप वेळेतच करावे जर प्रमुख पाहुणे येण्यास विलंब होत असल्यास सामने सुरू करावेत व त्यानंतर औपचारीकरित्या उद्घाटन करावे.

संयोजकांकडून आयत्या वेळेत काही कारणास्तव स्पर्धा रद्द झाल्यास उपस्थित असेलेले नियुक्त निरीक्षक, पंचप्रमुख, सहाय्यक पंच व पंच तसेच सहभागी झालेल्या संघांना आरक्षणासह प्रवास भाडे संयोजकांना द्यावे लागेल.

आपला,

(अॅड.आस्वाद पाटील)
सरकार्यवाह